# DECLARATION

It is hereby declared that, the work reported in this thesis is original and has not been previously submitted for any Diploma in this or any other University.

KARAD

(Mrs. Lata S. Pathak)

Date: 21 . 5 . 1990

+@+

# ऋ ण नि र्दे श

" मनुष्याच्या ठिकाणची प्रबल जिज्ञासावृत्ती जीवनाच्या अनेक अंगांचा सातत्याने शोध घेत असते." असे डॉ. वसंत स. जोशी म्हणतात. त्याप्रमाणे शोध निबंधाचे हे कार्य वर्षभराच्या अभ्यासाने, चिंतन मननाने साकार झाले आहे. कोणतेही कार्य माणूस एकटा कधीच करू शकत नाही. त्यामागे अनेकांचे प्रेरक सहकार्य असते. माझ्याही या कार्यात परिपूर्णता आणण्यासाठी ज्यांनी मनःपूर्वक सहकार्य केले त्यांचा ऋणनिर्देश करणे हे मी माझे नैतिक कर्तव्य समजते.

प्रस्तुत शोधनिबंधाचे चक्र चालू झाल्यापासून माझ्या मार्गदर्शक डॉ. सुमन रा. पाटील यांनी मला वेळोवेळी बहुमोलाचे सहकार्य दिले. आपल्या अनंत व्यापातून वेळ काढून मला हे कार्य करतांना मौलिक मार्गदर्शन केले व वेळोवेळी प्रोत्साहनही देऊन माझा विषयाच्या दृष्टीकोनातून आकलनाचा उत्साह वाढविला त्यांच्या ह्या अनमोल सहकार्याबद्दल त्यांचा ऋणनिर्देश करण्या ऐवजी मनःपूर्वक त्यांची ऋणाईत राहण्यातच मला आनंद वाटेल.

सुरुवातीपासूनच माझी जिज्ञासा ओळखून, संधी मिळेल तेंव्हा मला उत्स्फूर्तपणे प्रोत्साहन देणारे माझे पति श्रीकांत पाठक यांच्या संपूर्ण सहकार्यामुळे कौटूंबिक, घरगुती समस्यांवर मात करून मी हे कार्य संपूर्ण करू शकले. जीवनाच्या या वळणावर मला योग्य साथ मिळाल्यामुळे त्यांची मी ऋणाईत राहण्यातच धन्यता मानेन. वेळ प्रसंगी माझे होणारे दुर्लक्ष सहन करणाऱ्या माझ्या दोन मुलांचा सचिन, समीर उल्लेख केल्यावाचून राहावत नाही. माझ्या आई-वडीलांकडून लहानपणापासूनमिळत गेलेल्याप्रेरणेमुळे व कुटुंबातील नातेवाईकांच्या प्रोत्साहनामुळे मी हे कार्य करण्यास प्रेरीत झाले म्हणून मी त्यांची अत्यंत ऋणी आहे. प्रा. डॉ. ल. रा. नसिराबादकर, डॉ.गो. मा. पवार प्रा. डॉ. वि. रा. तोडकर प्रा. मा. के. यादव, प्रा. सौ. सूर्यमाला जाधव प्रा. बोळाण इ. व्यासंगी विव्दानांशी झालेल्या चर्चेमुळे विषयाला योग्य दिशा मिळाली. त्यामुळे त्यांचे हे सहकार्य मोलाचेच आहे. त्यामुळे मला काम करण्यास नेहमीच उत्साह वाटला. स.गा.म. कॉलेजचे प्राचार्य, महिलामहा विद्यालयाचे प्राचार्य डिसूझा यांच्याशी झालेल्या चर्चेतूनही मला मौलिक मार्गदर्शन मिळाले.

[illegible]. मी त्यांचेही ऋणनिर्देश करणे माझे नैतिक कर्तव्य आहे.

या शोधनिबंधासाठी संदर्भ साहित्य उपलब्ध करून दिलेल्या बद्दल विश्रामबागवाडा शासकीय ग्रंथालय, गोखलेहॉल पुणे येथील ग्रंथपाल सौ.साबणे व इतर सहकारी यांनी मला विविधज्ञान विस्ताराचे उपलब्ध अंक दिल्या बद्दल मी त्यांची ऋणी आहे. तसेच मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद ग्रंथालय व साहाय्यक ग्रंथपाल उषा हस्तक यांनी मला संदर्भग्रंथ पुरविल्याबद्दल मी त्यांची अभारी आहे. स.गा.म. कॉलेजचे ग्रंथपाल भोसले, नगरपालिका वाचनालय कराड विठ्ठलराव पाटील व त्यांचे सहकारी, महिला महाविद्यालय कराडचे ग्रंथपाल शहा, यांनी केलेल्या सहकार्यामुळे मी त्यांची ऋणी आहे. शोधनिबंधाचे सुबक टंकलेखन करणाऱ्या सौ. कुन्दा मु. फाटक व त्याच जिव्हाळ्याने बांधणी करणारे श्रीधरमुद्रणालयाचे श्रीधर कुलकर्णी या सर्वांची मी मन:पूर्वक ऋणी आहे. व इतर प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सहकार्य करणाऱ्या सर्वांची मी आभारी आहे.

= ◇ =